महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/संस्था बदल /४४१५
दिनांक : २२/०९/२०२२

**प्रति,**
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम/ पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत..**

**संदर्भ :** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८८९ दि. २२.०९.२०२२
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८७८दि. १६.०९.२०२२
३. या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/विवि/पदवी/शासकीय-अनुदानित संस्थाबदल २०२२-२३/२०२२/४१७७ दि. ०५.०९.२०२२
४. या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/विवि/पदवी/शासकीय-अनुदानित संस्थाबदल २०२२-२३/२०२२/३५९२ दि. २७.०७.२०२२
५. या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/विवि/पदवी/शासकीय-अनुदानित संस्थाबदल २०२२-२३/२०२२/३५९३ दि. २७.०७.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.०१ मधील परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यार्थ्यांना संस्था व पाठयक्रम बदलास अर्ज करण्यासाठी अखेरची संधी म्हणुन दि.३०.०९.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यास्तव सदर मुदतवाढीस अनुसरुन विषयांकीत प्रकरणी आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठीची कालमर्यादा संदर्भ क्र.०१ मधील पत्रासोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार निश्चित केली आहे.

सबब प्रस्तूत प्रकरणी प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र/ कागदपत्रांविना सादर केलेल अर्जाबाबत काहीही न कळविता असे अर्ज हदप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर कार्यवाही करताना सर्व संस्थांच्या प्राचार्यांनी काटेकोर पालन करावे

**सोबत :- संदर्भ क्र. ०१ चे पत्र**

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र-पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२२/८९१ दिनांक : 22 SEP 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८८९, दि.२२.०९.२०२२
२) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८७७, दि.१६.०९.२०२२
२) या संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८५१, दि.०८/०९/२०२२
३) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८५०, दि. ०८.०९.२०२२

विषयांकीत संदर्भीन परिपत्रक तथा पत्र पहावित.

संदर्भ क्रमांक १ अन्वये विद्यार्थ्यांना संस्था व पाठ्यक्रम बदलास अर्ज करण्यासाठी अखेरची संधी म्हणून दि.३०.०९.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यास्तव सदर मुतदवाढीस अनुसरून विषयांकीत प्रकरणी संस्था व आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठीची कालमर्यादा सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार निश्चित केली आहे. तरी, प्रस्तूत प्रकरणी सोबतच्या प्रपत्रात नमूद केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना विभागीय कार्यालय स्तरावरुन व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकार पालन करावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर
१. मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र,एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये,महाराष्ट्र राज्य (संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
कार्यासन क्रमांक - निवड नस्तीस

# प्रपत्र अ

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल /पाळी बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि.०१/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या १ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | प्राचार्य, संबंधित संस्था यांचे स्तरावरून सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांचे मान्यतेने |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.०३/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या २ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणाऱ्या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि.०७/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस आधी यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणाऱ्या विद्यापीठाबाहेरील प्रस्तावांची दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी तंत्र शिक्षण संचालनालयास पाठविण्यात यावेत. | दि.०४/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) दिनांकाच्या १ दिवस आधी यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |